# पोलिओ

## पोलिओ म्हणजे काय?

पोलिओ हा जगभर आढळणारा विषाणूजन्य संसर्गजन्य आजार आहे. या विषाणूची लागण झालेल्या अनेक व्यक्तींना पोलिओची लक्षणे दिसत नाहीत आणि त्यांना माहितही नसते की त्यांना अशी लागण झालेली आहे. परंतू काही व्यक्तींना पोलिओ विषाणूमुळे अतिशय गंभीर स्वरुपातील तात्पुरत्या किंवा  कायमची विकलांगता येते जी जीवघेणीही असू शकते.

## पोलिओची लक्षणे:

- ताप 38c(100.4F) किंवा त्यापेक्षा अधिक
- लाल झालेला घसा
- डोकेदुखी
- पोटदुखी
- स्नायूत पेटके येणे
- सतत बरे नाही असे वाटत राहणे

काही वेळा पोलिओचा विषाणू पाठीच्या कणा व तळभाग असलेला मेंदूचा भाग यावर हल्ला करतो त्यामुळे विकलांगता येते विशेषतः पायातील अत्यल्प प्रमाणात बाधित व्यक्ती कायमस्वरुपी विकलांग होतात, ज्यांना दिर्घकालीन उपचार व आधाराची गरज असते.

त्यामध्ये समावेश असू शकतो

- स्नायू विकलांग होणे/स्नायूतील शक्ती नाहीशी होणे
- स्नायूचा कंपवात
- सांधे जखडणे
- सदोष अवयव जसे दुभंगलेले पाय

## पोलिओची बाधा कशी होते?

बाधित व्यक्तीची विष्ठा किंवा शिंकण्यातून, खोकण्यातून उडालेले तुषार यांच्या संपर्कात आल्याने पोलिओ विषाणूची बाधा होते

## प्रतिबंध:

पोलिओला बरे करता येत नाही परंतू प्रतिबंध करता येतो. पोलिओची लस लहानपणीच अनेक वेळा दिल्याने पोलिओस प्रतिबंध होतो. तोंडावाटे घ्यावयाची पोलिओ लस (OPV) म्हणजे काय?

तोंडावाटे घ्यावयाच्या पोलओ लसीमध्ये तीनही प्रकारचे पोलिओ विषाणू शक्ती कमी केलेले किंवा बाधा करण्यास अक्षम केलेले असतात त्यास प्रतिकार शक्तीकडून होणा-या प्रतिसादाची नक्कल करण्याची क्षमता दिसते. परंतू मध्यवर्ती मज्जासंस्थेत पसरण्याची शक्यता कमी असते.

(OPV) रक्तात (रक्त किंवा रक्तरस प्रतिकारशक्ती) तीनही प्रकारच्या विषाणूंची प्रतिपिंडे तयार करते आणि बाधा झाल्यास ती व्यक्तीच्या मज्जासंस्थेस पसरण्यास प्रतिबंध करतात व विकलांगतेपासून संरक्षण करतात.

## महत्वाचे मुद्दे:

- पोलिओ मुख्यतः5 वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना बाधा करतो.
- पोलिओ पुर्णपणे बरा होत नाही परंतू त्यास लसीद्वारे प्रतिबंध करता येतो.
- जोपर्यंत आपण पोलिओचा समूळ नाश करत नाही तोपर्यंत प्रत्येक बालकांस याचा धोका आहे.

**संदर्भ:**मायक्रोमेडेक्स केअर नोट सिस्टिम